# बृहन्मुंबई महानगरपालिका

परिपत्रक क्र./02 /प्र.अ.(रा) दि. 03.06.2026

**विषय:** मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १५२ अ मधील तरतूदीनुसार बेकायदेशीर बांधकामावर प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पटी इतक्या दराने शास्तीची आकारणी करण्याबाबत.

**संदर्भ :** 1) सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ३ दि.०८ जानेवारी, २०१७

2) सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५१ दि. ०१ सप्टेंबर, २०१७

3) स्थायी समितीचा ठराव क्र.१३५ दि. २५.०४.२०१८

4) महानगरपालिकेचा ठराव क्र.१८६ दि.२९.०६.२०१८

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १५२अ नुसार बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील बेकायदेशीर बांधकामावर मालमत्ता कराच्या दुप्पट दंड आकारणी करण्याबाबतची तरतूद दिनांक ०१.०४.२०१० पासून शासनाद्वारेकरण्यात आली. या मूळ तरतूदीनुसार मुंबईमधील निवासी तसेच अनिवासी अशा सर्वच बेकायदेशीर बांधकामांवर मालमत्ता कराच्या दुप्पट दंड आकारणी करण्यात येते.

सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ३ दि.०८ जानेवारी, २०१७ तसेच सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५१ दि. ०१ सप्टेंबर, २०१७ अन्वये अधिनियमातील कलम १५२ अ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आली.

**कलम १५२अ :-** मुंबई महानगरपालिका अधिनियम याच्या कलम १५२ अ मधील ,पोट कलम (१) मध्ये दरवर्षी अशा इमारतीवर बसविण्योग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटीइतकी शास्ती भरण्यास पात्र असेल या मजकूराऐवजी , खालील मजकूर दाखल करण्यात आला आहे:-

अशा इमारतीवर महानगरपालिकेकडून ठरविण्यात येईल अशा दराने शास्ती भरण्यास पात्र असेल.

उपरोक्त सुधारणेनुसार असे स्पष्ट होते कि बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील बेकायदेशीर बांधकामांवर दंड आकारणीचे दर ठरविण्याची बाब ही सर्वस्वी महानगरपालिकेच्या अधिन आहे. त्यानुसार महानगरपालिकेने स्थायी समिती ठराव क्र.१३५ दि. २५.०४.२०१८ व महानगरपालिका ठराव क्र.१८६ दि.२९.०६.२०१८ मंजूर केले. सदर ठरावानुसार "अनधिकृत निवासी बांधकामांवर प्रभावी आळा बसविण्याकरिता, दि.०८ जानेवारी, २०१७ पासून बृहन्मुंबईतील बेकायदेशीर बांधकामांवर प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पटी इतक्या दराने शास्तीची आकारणी करण्यास मंजूरी घेण्यात आली आहे.

सदर परिपत्रकाद्वारे निर्देश देण्यात येत आहेत की, संदर्भित ठरावानुसार "अनधिकृत निवासी बांधकामांवर प्रभावी आळा बसविण्याकरिता, दि.०८ जानेवारी, २०१७ पासून बृहन्मुंबईतील बेकायदेशीर बांधकामांवर प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पटी इतक्या दराने शास्तीची आकारणी करण्यात यावी.

सदर परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

| | | |
|---|---|---|
| 3-6-2026 | 3/6/26 | 3/6/26 |
| करनिर्धारक व संकलक (प्र) | सह आयुक्त (कवसं) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त(शहर) |